सकाळ

# पुणे शहर विभाग जलतरण संघ जाहीर

**पुणे, ता. २३ :** नाशिक येथे सुरू झालेल्या आंतरविभागीय जलतरण स्पर्धेसाठी पुणे शहर विभागाचा संघ जाहीर करण्यात आला. पुणे शहर विभागाचा संघ असा : **मुले :** विराज ढोकले, श्वेजल मानकर (मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर), प्रसाद कंडुल, प्रथमेश सोनार, रोहन पौनिकर, ईशान भुजबळ (गरवारे वाणिज्य महाविद्यालय), इंद्रनील महेकर (एमएम सीओई). राखीव : स्वयंभू धुरी (एमएमसीसी), सुधांशू साखला (गरवारे वाणिज्य महाविद्यालय). **मुली :** युगा बिरनाळे (बीएमसीसी), आर्या राजगुरू (मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर), रिद्धी हगवणे (कावेरी कॉलेज), साध्वी धुरी (एमएमसीसी), प्रांजल ताथवडे साक्षी छाजेड (एम. एम. कॉलेज ऑफ ऑर्किटेक्चर), साक्षी शिरोडे (स.प. कॉलेज), वैष्णवी पाटील (अरिहंत विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय), श्रेय दिघे राखीव : नूतन शर्मा.

Pune, Pune-Today
24/08/2019 Page No. 12

पुढारी

# आकांक्षा खराडे, बापूराव जाधव विजेते

## आंतरमहाविद्यालयीन योग स्पर्धा

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे शहर आंतरमहाविद्यालयीन योग स्पर्धेत मुलींमध्ये पुणे विद्यापीठाच्या आकांक्षा खराडे, तर मुलांमध्ये एमएमएमएससी लॉ कॉलेजच्या बापूराव जाधव या खेळाडूंनी विजेतेपद पटकाविले.

पुणे शहर विभागीय क्रीडा समिती आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत आंतरमहाविद्यालयीन योग (मुले व मुली) स्पर्धा विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे सुरू आहे. या स्पर्धेच्या सांघिक गटात मुलींमध्ये श्री सिद्धिविनायक महिला महाविद्यालयाने प्रथम, सेंट मीरा महिला महाविद्यालयाने द्वितीय, तर आबासाहेब गरवारे महाविद्यालयाने तृतीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेत एकूण १५ महाविद्यालयांतील ५० स्पर्धकांनी सहभाग घेतला.

स्पर्धेचे उद्घाटन विद्यार्थी मंडळाचे डीन डॉ. आर. एस. आचार्य यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुणे शहर क्रीडा समिती उपाध्यक्ष रवी पाखरे, अभिजित परसे, डॉ. आशा बेंगाळे, शांताराम ढमाले, गौतम सोनवणे, शहर विभागाच्या सचिव डॉ. मनीषा कोंढरे, उमेश बिबवे आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेचे नियोजन प्रा. नामदेव फटांगरे, साहिल पारकर, समर्थ कोल्हे, सूर्या रुईकर, आकाश सबणे यांनी केले.

या स्पर्धेमध्ये मुलांच्या गटात एमएमएमएससी लॉ कालेजच्या बापूराव जाधव याने प्रथम क्रमांक, एच. व्ही. देसाई कॉलेजच्या नितीन पवळे याने द्वितीय क्रमांक, फर्ग्युसन कॉलेजच्या सय्यद मारुफने तृतीय क्रमांक, आगाशे कॉलेजच्या गजानन जाधव याने चौथा क्रमांक, पुणे विद्यापीठाच्या सुनील ढाकणे याने पाचवा क्रमांक, तर सूर्यदत्त कॉलेजच्या अनिमेष पाध्येने सहावा क्रमांक पटकाविला. मुलींच्या गटामध्ये पुणे विद्यापीठाच्या आकांक्षा खराडेने प्रथम क्रमांक, सिद्धिविनायक कॉलेजच्या राजश्री पटवर्धन, वैष्णवी वाखारे, शिवाजी जगताप आणि शिवानी मुळीक यांनी अनुक्रमे द्वितीय ते पाचवा क्रमांक, तसेच आबासाहेब गरवारे कॉलेजच्या जाई कवठाणकर हिने सहावा क्रमांक पटकाविला.





आंतरमहाविद्यालयीन योगा स्पर्धेतील सहभागी खेळाडू विविध कसरती करताना.

My Pune Edition
24 Aug, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

सकाळ

# महाविद्यालयीन योगा स्पर्धेत आकांक्षा खराडेला प्रथम स्थान

**पुणे :** व्हीआयआयटी आयोजित पुणे शहर विभाग आंतरमहाविद्यालयीन गटाच्या योगा स्पर्धेत मुलींच्या गटात पुणे विद्यापीठाच्या आकांक्षा खराडेने ९१.६७ गुणांसह प्रथम स्थान मिळविले. कोंढवा बुद्रुक येथील विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलाजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (व्हीआयआयटी) येथे झालेल्या या स्पर्धेत मुलींच्या गटाच्या सांघिकमध्ये कर्वेनगर येथील श्री सिद्धिविनायक कॉलेजने प्रथम, सेंट मीराज कॉलजने द्वितीय, तर आबासाहेब गरवारे कॉलेजने तृतीय क्रमांक मिळविला. कर्वेनगर येथील श्री सिद्धिविनायक कॉलेजच्या राजश्री पटवर्धनने (७५.०० गुण) दुसरा, वैष्णवी वाखारेने (७३ गुण) तिसरा, शिवानी जगतापने (७२.१७ गुण) चौथा, शिवानी मुळीकने (६८.८३ गुण) पाचवा तर आबासाहेब गरवारे कॉलेजच्या जाई वठाणकरने ६६ गुण मिळवून सहावा क्रमांक मिळविला. या स्पर्धेचे उद्घाटन डॉ. आर. एस. आचार्य यांच्या हस्ते झाले. या वेळी नामदेव फटांगरे, रवी पाखरे, अभिजीत पर्से, डॉ. आशा बेंगळे, गौतम सोनावणे, ओंकार थोरात उपस्थित होते.

Pune, Pune-Today
24/08/2019 Page No. 12